ISSN: 2249-894X Impact Factor :3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 1 | October - 2016

Review Of Research

# मराठी भाषेच्या विकासाचे आव्हान आणि : उपाय

प्रा.डॉ. इ.जा. तांबोळी
प्रमुख मराठी विभाग, सोशल कॉलेज, सोलापूर.




## प्रास्ताविक :-

समाजात एकसंधता दिसत नाही. नागर/ग्रामीण, बहुजन/महाजन, भिन्न जाती-जमाती, शैक्षणिक स्तर, जीवनमूल्ये इत्यादी बाबतीत या पन्नास वर्षात खूप बदल झालेले आहेत. एकाच समाजात अनेक प्रकारचे घटक आढळतात. समाजाच्या भाषेच्या जाणिवेबद्दल नेमके असे विधान करता येत नाही. अनेक भाषा अस्तित्वात आहेत. एकमेकांवर त्या परिणाम साधत आहेत. इंग्रजी, उर्दू, फारसी, कन्नड, हिंदी इत्यादी भाषेतून अनेक शब्द मराठीत रूढ झाले आहेत.

आजच्या काळात आपण बहुभाषिक आहोत. आपल्या बोलण्यात एकापेक्षा अनेक भाषांचा उपयोग होतो. आज सर्वांना इंग्रजीचे स्वप्न पडले आहे. मराठी शाळात विद्यार्थी कमी होत आहेत. भाषेला काळ, प्रदेश, जात, व्यवसाय यांची बंधने पडतात. `मराठी' ज्ञानभाषा म्हणून गांभीर्याने याचा स्वीकार झालेला नाही. प्रमाणभाषेतून ज्ञान ग्रहण करण्याची क्षमता निर्माण झाल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही. याचे भान समाजाला राहिले नाही. कृत्रिम लेखनाला आजपर्यंत प्रतिष्ठा मिळाली. अस्सल ग्रामीण जीवनाचे चित्र स्पष्ट करणाऱ्या लेखनाची शैली नंतर कळू लागली. अस्सल व नक्कल यातील रेषा आता दिसू लागली. भाषेची ताकद दिसू लागली. तिला परिवर्तनाची धार आहे. नव-नवे परिणाम घडवायचे आहेत. नवेरूप धारण करून नवे आवर्तन प्रकट करायचे आहे. समाजाच्या सांस्कृतिक व सामाजिक जीवनात नवे समीकरण मांडायचे आहे. ही भाषीक जाणीव अपेक्षा करणारी आहे.

## १) आर्थिक दारिद्र्य :-

आर्थिक दारिद्र्यात साधारणपणे ६०% समाज रूतलेला आहे. सततची वाढ मानवी जीवनाला सतावते. माणूस आपली भाषा वापरताना तो दबलेला दिसून येतो. त्याच्या राहणीमानाचा दर्जा आणि आर्थिक बिकट अवस्था : यामुळे तो त्याचा आवाज गमावून बसतो. सतत लाजीरवाणे जीणे त्याला अस्वस्थ करते. यामुळे त्याचा आवाज नाहीसा होतो. त्याची भाषा सतत स्वीकारणारी, होकारणारी दिसून येते. नवीन असे स्थित्यंतर त्यांच्या भाषेत दिसून येत नाही.

साधारणपणे कामगार, शेतकरी, कष्टकरी अशा प्रवर्गातील लोकांची भाषा व तिचे सारेच काही वळण वेगळेच दिसून येते. एका विशिष्ट समाजातली सगळी माणसे एकच भाषा बोलतात हे खरे. गटानुसार किंवा व्यक्तीनुसार त्या भाषेच्या आत दुसरे रूप तयार होते. गटाकडून किंवा व्यक्तीकडून बोलल्या जाणाऱ्या रूपापेक्षाही व्यक्तीकडून बोलले जाणारे रूप जास्त गमतीचे व जास्त मजेशीर असते. ते रूप त्या व्यक्तीची निर्मिती असते.

सुधारलेला समाज शिक्षकांना `सर' म्हणून हाक मारेल. शिक्षकाचा उल्लेख सर, सर करेल. दबलेला माणूस `गुरुजी' म्हणून उच्चार करेल. माणूस हा भाषिक सवयीमुळे किंवा भाषिक लकबीमुळे वेगळा ठरतो. जगात दोन माणसे एकमेकासारखी दिसतात. पण दोन माणसे एकमेकांसारखी भाषा बोलणारी दिसत नाही.

## २) परकीय भाषेचा स्वीकार :-

आज परिस्थिती बदललेली आहे. दळण-वळणात वाढ झाली आहे. सर्व व्यापारांचे जाळे आता सर्वदूर पसरलेले आहे. तंत्रज्ञानामुळे नवनवे दाल निर्माण झाले आहेत. याचा परिणाम भाषेवर झालेला आहे. किमान माणूस चार भाषा बोलणारा झालेला आहे.

कुटुंबात बोलणारी भाषा वेगळीच आहे. समाजात वावरताना, प्रशासकीय व्यवहारात, इत्यादी ठिकाणी भिन्न भिन्न भाषेचा उपयोग करीत आहे. अनेक परकीय भाषेचाही स्वीकार माणसाने केलेला आहे. इंग्रजी, चिनी, जपानी, इत्यादी भाषा शिकण्याचे वर्गही सुरू आहेत. एकंदरीत अनेक परभाषेतील शब्द आपल्या भाषेत स्थिर झालेले आहेत. एक वेगळेच स्थित्यंतर भाषेत घडलेले दिसून येते. आज अनेकांगी होणारे लेखनही विविध भाषेतील संकल्पना स्वीकारून होताना दिसून येते.

### ३) एकापेक्षा अनेक भाषेच्या प्रवाहात राहणे :-

माणसाभोवती भिन्न, भिन्न भाषा बोलणारा समूह असतो. आज खंडीभर भाषांना लिपी नाही नि त्याची नोंद नाही. हिंदी, दख्खनी, कानडी, तेलुगू, गुजराथी इत्यादी भाषा बोलणारा समूह दिसून येतो. मुख्य प्रवाहात प्रमाण भाषा म्हणून तो मराठी बोलतो. मराठी भाषा बोलताना उच्चार, आरोह-अवरोह, स्वराघात, बलाघात तो मूळ आपल्या भाषेतील घेऊनच मराठीचा उच्चार करतो.

मार्क्सवादी परिभाषेत सांगायचे, तर भाषेचा समावेश समाजाच्या बांधणीमध्ये इमारतीच्या पायामध्ये होतो. भाषिक समता साध्या गोष्टीवर आधारलेली आहे. भाषा सगळ्यांना येते. कला, औद्योगिक, राजकीय इत्यादी क्षेत्रात बोलणाऱ्याला ऐकणाऱ्याचीही भूमिका पत्कारावी लागते. भाषा संपादनाची क्रिया ही काही अंशी नैसर्गिक वादीवरही अवलंबून आहे. स्वभाषेत साक्षर असणारी व्यक्ती इतर भाषेत निरक्षर असते. स्वभाषेच्या उपयोग आत्मविश्वासपूर्वक करता यायला पाहिजे.

माणूस विविध अशा जाणीवा समृद्ध करत असतानाच तो विविध नव-नव्या भाषेच्या प्रवाहात राहत आहे. नवी भाषा लिहित-बोलत आहे.

### ४) प्रभावी वाङ्मयनिर्मिती न होणे :-

आज महाराष्ट्रात मराठीपुरता जर विचार केला तर वाङ्मयनिर्मितीची प्रक्रिया गतीमान आहे. थंडावलेली म्हणणे गैर आहे. प्रभावी वाङ्मयनिर्मित झालेली आहे असा शोध काहींनी मांडलेलाही आहे. १९६० नंतर मराठी साहित्यात झालेले बदल खूप काही नवे आंदोलने दर्शवितात. नवसाहित्य प्रवाहाची रेषा दिसते. एखादी कादंबरी, एखादा काव्यसंग्रह कवटाळून घ्यावा अशी अवस्था नाही.

विविध साहित्यप्रवाहाचा धांडोळा तपासला असता काही अंशी जाणिवा रेखाटल्या गेल्या. सर्वसमावेशक अशी निर्मिती दिसून येत नाही.

### ५) राजकीय आश्रय :-

भाषेला राजकीय आधारही मिळालेला दिसून येतो. विजय नगरच्या साम्राज्यात संस्कृतही राजदरबाराची भाषा होती. राज्यकारभार संस्कृतमध्ये होत होता. अशा वातावरणातही कन्नड, तेलुगू भाषा उदयास आल्या. या भाषेतूनच लोकांनी आपला व्यवहार सुरू ठेवला. संस्कृतला फेकून दिले. पोलाकच्या मते संस्कृत ही लॅटिनसारखी मेलेली भाषा आहे. राज्यसत्तेखाली असलेल्या संस्कृतला लोकांनी नाकारले.

१६ व्या शतकात `दखनी' ही आदिलशाहीमध्ये राजकारभाराची भाषा होती. दखनीत समृद्ध असे साहित्यही निर्माण झाले. दखनीतून समग्र असे साहित्य व साहित्यिकांची परंपरा निर्माण झाली. आज दखनी भाषा बोलणारे भारतभर आहेत. दखनीतून साहित्यनिर्मिती थंडावलेली आहे.

एखाद्या भाषेच्या जीवनातही असे स्थित्यंतरे दिसून येतात. काळानुरूप लोक भाषेला स्वीकारतात. हिंदी, उर्दू, इतर भाषा ह्या दखनीतून निर्माण झाल्या असे न म्हणता दखनीची या भाषेतून उगम झाली असा जावई शोधही संशोधकांनी लावलेला आहे. तो निराधार आहे. मराठी भाषेचा उगम कसा झाला? यावर अधिक सकस वा प्रामाणिक संशोधन होणे गरजेचे आहे.

### ६) भाषा व्यवहार व जीवनव्यवहार :-

भाषा नसती तर सारे जीवन अंधारलेले झाले असते. माणसा-माणसात संपर्क, देवाण-घेवाण, अशक्य झाले असते. आचारसाम्य निर्माण करण्याची वैचारिक मान्यता, समाजमन निर्मिती यासाठी भाषेची गरज आहे. संकल्प, निवड, साठवण केल्याशिवाय मानव टिकणार नाही. व्यक्तीच्या पहिल्या श्वासापासून अखेरच्या श्वासापर्यंत असंख्य जीवन व्यवहार चालतात त्यातील लेखन-वाचन, भाषण-श्रवण या जीवन व्यवहाराशी भाषा व्यवहार समव्याप्त आहे.

भाषिक स्थित्यंतर किंवा जाणीव संक्रमणाच्या जीवन व्यवहाराचा कणा म्हणजे भाषा होय. जाणीव संक्रमण भाषेद्वारे होते. भाषा व्यवहार महत्त्वाचे साधन आहे. कम्युनिस्ट जाहीरनाम्याने राज्यक्रांती घडली. शतकभर अधिराज्य गाजवले. विवेकाचे वरदान समाजाला अभय देत आहे. भाषेतील स्थित्यंतर महत्वाचे आहे. कोणतीही व्यक्ती कोणत्याही कालखंडात जन्माला आली असली तरी जन्मल्याबरोबर ती केवळ जैविक मानव असते. त्या अवस्थेपासून ते समाजाच्या तत्कालीन जीवनविश्वाचा भागीदार बनण्यापर्यंतचा मोठा प्रवास सुमारे वीस-पंचवीस वर्षाच्या कालखंडात पूर्ण करण्यासाठी भाषा हाच आधार असतो. त्याच्या जीवनात घडलेले स्थित्यंतर हे भाषिक स्थित्यंतर आहे. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

### ७) मराठी भाषा निर्मितीचा विचार चुकीचा :-

मराठी भाषेचा उगम संस्कृतः प्राकृतः अपभ्रंशः मराठी असा क्रम सांगितला जातो. हा पूर्णपणे चुकीचा आहे. आपण नवव्या शतकातल्या साधनांचा शोध घेतो नि मराठीचा गोडवा गाण्यास सुरूवात करतो. किती हा मूर्खपणा आहे. चौथ्या व पाचव्या शतकात जैन मुनी बोलत आहेत. लिहित आहेत. ती भाषा कोणती? साधू-सिद्ध आपली कवने रचत आहेत ती भाषा कोणती? या अनेक प्रश्नांचा उहापोह अजून व्हायचा आहे. मराठी भाषेचा उगम आपण दखनी भाषेत शोधण्यास काहीही हरकत नाही. पाचव्या शतकात पहिला सुफी भारतात आला. त्यानी या मातीची भाषा शिकली. याच भाषेतून त्यांनी इस्लामची तत्त्वे सांगितली. त्यांची भाषा लिपी फारसी होती. त्यानी फारसी लिपीचा आधार घेतला. फारसी लिपीतून दखनी साहित्य बद्ध झाले. हा इतिहास संशोधकाला माहित नाही याचा शोध घेणे गरजेचे आहे. यासाठी मराठी भाषेच्या पुर्ननिर्मितीचा विचार मांडणे आवश्यक आहे.

### ८) मराठी भाषा विकासाचे आव्हान :-

मराठी भाषा विकासासाठी एक खूप मोठे आव्हान आज उभे राहिले आहे. एका वेगळ्याच गर्तेत समाज ओढला जात आहे. बहुभाषिक व्हावे यासाठी आपला विरोध नाही. मराठीचा पूर्णपणे धिक्कार करणे योग्य नाही. पाचव्या शतकापासून मराठीचे दाखले आज उपलब्ध आहेत. त्याही अगोदर निश्चित असा काळ सांगता येणार नाही. अडीच ते तीन हजार वर्षापूर्वीची परंपरा सांगणारी मराठी अभिजात भाषा आहे. त्यादृष्टीने शोध घेतला असता बाराव्या व तेराव्या शतकात दखनीत प्रचंड साहित्य निर्मिती झाली. दखनी आदिलशाही दरबाराची भाषा होती. त्याकाळातील राजभाषा म्हणून तिचा साज होता. मराठीचा सारा साज दखनीतच दिसून येतो. अशाप्रकारे संशोधन होणे क्रमप्राप्त आहे.

### ९) मराठी भाषेविषयी निर्माण झालेली स्थिती :-

महाराष्ट्राच्या स्थापनेला आज ४८ वर्षे पूर्ण झाली. अनेक राज्यात विभागालेला मराठीवाल्याच्या मनात आनंदाचे वारे वाहिले. ऐतिहासिक, राजकीय, सांस्कृतिक, बाबीमुळे महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागाचे या ना त्या बाबतीत वेगळेपण जाणवते. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, कोकण, मराठवाडा, मुंबई असे हे महाराष्ट्राचे जाणवणारे विभाग आहेत. शहराचे फुगणे खेड्यांचे ओस पडणे. कोकणातले सारे जिल्हे मुंबईवर अवलंबून आहेत. खानदेश म्हणजचे उत्तर महाराष्ट्र हा भाग पुन्हा थोडासा वेगळाच आहे. अहिराणी, वऱ्हाडी, डांगी, कोकणी व तिच्या २७ बोली, खानदेशी या अशा मराठीच्या बोली आज संपन्न आहेत. अनेक प्रतिभावान साहित्यिक निर्माण झाले. पश्चिम महाराष्ट्रात दिग्गज निर्माण झाले. आज महाराष्ट्रात सर्वच राज्यातून विविध भाषा बोलणारा लोंढा स्थिर झालेला आहे. त्यांची प्रमुख भाषा ठेवून ते मराठी बोलत आहेत. आंध्र, कर्नाटकातून बराच जनसमूह मराठीशी एकरूप झालेला आहे. आज विदर्भाची मागणी, उत्तर भारतीयांचे आगमन व काही राजकीय व्यक्तींचे तकलादू भाषा वाद या सर्व वातावरणाचा परिणाम होताना दिसत आहे.

### १०) मराठी भाषे विषयीचा दृष्टिकोन :-

१९८९ साली वि.वा. शिरवाडकरांनी जागतिक मराठी परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना म्हणाले की, ``डोक्यावर फक्त राज्यमान्यतेचा मुकुट बाकी अंगावरच्या फाटक्या लक्तरानिशी मंत्रालयाच्या दाराशी मराठी भाषा दीवाणेपणाने उभी आहे." अशी उदासीनता शिरवाडकरांनी प्रकट केली होती.

गेली ७० ते ७५ वर्षे मराठी विषयीची लक्तरे ऐकू येतात. मुळातच मराठी भाषेचा उगमाचा इतिहासच चुकीचा मांडलेला आहे. १४ ते १७ व्या शतकात दखनी भाषेत फारसी शब्दांचा शिरकाव झाला. याच दखनीतून उगम पावलेल्या मराठी भाषेतही फारसी शब्द स्थिर झाले. मराठी भाषेवर फारसीचे आक्रमण झाले असे म्हणता येणार नाही. परकीय सत्ताधारी भारतभूमीत आले. त्यांनी या मातीतल्या भाषा शिकून घेतल्या. या भाषेची एकरूप झाले. याच भाषेत त्यांनी साहित्यनिर्मिती केली. फारसी लिपीचा वापर केला नि दखनी भाषेत साहित्य रेखाटले.

इंग्रजीचा प्रभाव इतका झालेला आहे की मराठी भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे असे वि. का. राजवाडे यांनी १९४६ साली म्हटले होते. आज इंग्रजी शब्दांचा भरणा सर्वच भाषेत झालेला दिसून येतो. दलित साहित्याच्या निर्मितीने १९६० नंतर पुन्हा एकदा मराठी साहित्यात जाग आली. आपल्या वेदना, जाणिवा, इच्छा, आकांक्षा त्यांनी प्रकट करण्यास सुरूवात केली. एक वेगळा अनुभव दिसून आला. सर्वच स्तरावर मराठीत साहित्यनिर्मिती झाली. मराठी भाषेविषयीचा विस्तार वाढलेला दिसून येतो.

### ११) मराठीचा विकास नि उत्कर्षासाठी काही उपाय :-

आज जगभर तीन ते साडेतीन हजारावर भाषा आहेत. भाषाही माणसाला मिळालेली देणगी आहे. आज मराठी चौथ्या क्रमांकावर बोलली जाणारी भाषा आहे. एकूण लोकसंख्येच्या चौथ्या क्रमांकावर ही भाषा आहे. मानवी जीवन भाषेशिवाय अशक्य आहे. मराठीच्या उगमाविषयी विविध मतमतांतरे आहेत. अभ्यासकांनी चुकीचा उगम मांडलेला आहे. मराठी ही अडीच हजार वर्षापूर्वीची अभिजात भाषा आहे. सर्वच भाषेंनी एकमेकांशी देवाण-घेवाण केलेली आहे. अनेक वादस्थळे आजही उभी आहेत.

दूरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे या माध्यमातून मराठीचा पुरस्कार होताना दिसत आहे. या वरील माध्यमातून मराठीची चुकीची रूपे आढळत असल्याची तक्रार आहे. ठिकठिकाणी भाषेविषयीची जागरूकता दिसून येत नाही. ही जागरूकता दिसून येणे गरजेचे आहे. आज अनेक पत्रकारितेतील सन्माननीय भाषेच्या बाबतीत जागरुकता दाखवित आहेत असे नाही.

वार्ता लिहिणारे, संगणकावर अक्षर जुळणी करणारे, मुद्रित तपासणारे, यंचा ताळमेळ दिसत नाही तो जुळावा असे वाटते.

अज्ञान आणि उदासिनता यामुळे होणाऱ्या चुका टळू शकतील. मराठीसाठी जे कोश उपलब्ध आहेत त्याचा वापर करावा. त्यामुळे अनेक लेखन चुका थांबतील. अनेक सार्वजनिक ठिकाणी मराठीची रूपे शुद्ध लिहिण्याचा प्रयत्न करावा. काला घोडा, काली तील, काली मुंग असे अनेक शब्द बोर्डावर दिसत असतात.

महाराष्ट्रात प्रसार माध्यमातून हिंदी आणि इंग्रजीचा वावर खूप मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. मराठीच्या अनेक बोलींचे संशोधन होणे गरजेचे आहे. आपल्या भाषेचे सौंदर्य शब्दयोजनेत आणि वाक्यरचनेत आहे हे आपण ओळखले पाहिजे. केंद्र व राज्य पातळीवरही मराठी भाषा विकासासाठी अनेक उपक्रम राबवावेत असे वाटते.

**१२) समारोप :-**

या शोधनिबंधात जी चर्चा केलेली आहे. ही अल्पशी अशीच आहे. संशोधनाचा आवाका खूप मोठा आहे. या शोधनिबंधात आर्थिक दारिद्र्य, परकीय भाषेचा स्वीकार, यावरही चिंतन केले आहे. एकापेक्षा अनेक भाषेच्या प्रवाहात राहिल्याने होणारा परिणाम यावरही प्रकाश टाकलेला आहे. प्रभावी वाङ्मयनिर्मिती होणे गरजेचे आहे. मराठी निर्मितीचा पुर्नविचार मांडावा लागणार आहे. मराठी भाषेचा विकास होणेसाठी काही विचार या शोधनिबंधात मांडलेले आहेत.